**पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांचे कर्तव्य.**

१) महामार्गावर वाहतुकीचे नियमन करणे व अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकिय मदत मिळण्याची व्यवस्था करतील.

२) महामार्गावर गस्त करून प्रवाशांना सुरक्षा प्रदान करतील.

३) महामार्गावरुन वाहनाने प्रवास करणाऱ्या नागरीकांना दवाखाने, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे व विश्रामगृहाबाबत माहिती देतील.

४) महामार्गावर वाहतूक सुरळीत राहिल याची दक्षता घेतील.

५) अपघाताची सूचना संबंधीत पोलीस ठाणेस देतील.

६) महामार्गावर अडकून पडलेल्या वाहनांच्या चालकांना मदत करणे व नादुरुस्त/ बंद वाहनांना महामार्गावरुन बाजूला करून वाहतुक सुरळीत करतील.

७) वाहतुक विषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यास मदत करतील.

८) नागरीकांमध्ये रस्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी स्थानिक पोलीस स्टेशनच्या मदतीने महामार्गालगत असणाऱ्या गावात जाऊन स्थानिक ग्रामपंचायत सदस्यांच्या मदतीने/सहकार्याने हेल्मेट व सिटबेल्ट वापरण्याबाबत तसेच रते अपघाताबाबत जनजागृती करावी, तसेच शाळा, महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षाबाबत कार्यक्रमांचे आयोजन करून हेल्मेट व सिटबेल्ट यापरण्याबाबत व रस्ते अपघाताबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करतील.

९) महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तिंच्या प्रवासाच्या वेळी महामार्गावरील वाहतुक सुरळीत व सुरक्षित ठेवतील.

१०) प्रवाश्यांसोबत सौजन्याने वागावे व सभ्यतेची वागणुक देतील.

११) मुंबई पोलीस कायदा ६६ प्रमाणे वाहतुक नियमनाशी संबंधित सर्व कर्तव्ये पार पाडतील.

१२) कर्तव्याचे ठिकाणी वेळेवर पोहोचुन प्रभारी अधिकारी यांनी दिलेली कार्य शिस्तीने पुर्ण करतील.

१३) केलेल्या कार्याचे नोंद पॉकेट डायरी / वर्कशिट मध्ये घेतील.

१४) महामार्ग पोलीस राता सुरक्षेच्या दृष्टीने वरिष्ठांनी जारी केलेले परिपत्रक व निरीक्षण टिप्पणी, शासन आदेशाची माहीती घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही करतील.

१५) मा. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व आदेश यांची तत्परतेने अंमलबजावणी करतील.

**सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक/पोलीस हवालदार यांचे कर्तव्य**

१) महामार्गावर वाहतुकीचे नियमन करणे व अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकिय मदत मिळण्याची व्यवस्था करतील.

२) महामार्गावर गस्त करून प्रवाशांना सुरक्षा प्रदान करतील.

३) महामार्गावरुन वाहनाने प्रवास करणाऱ्या नागरीकांना दवाखाने, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे व विश्रामगृहावाबत माहिती देतील.

४) महामार्गावर वाहतूक सुरळीत राहिल याची दक्षता घेतील.

५) अपघाताची सूचना संबंधीत पोलीस ठाणेस देतील.

६) महामार्गावर अडकून पडलेल्या वाहनांच्या चालकांना मदत करतील व नादुरुस्त / बंद वाहनांना महामार्गावरुन बाजूला करून वाहतुक सुरळीत करतील.

७) वाहतुक विषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करतील.

८) महामार्गावर ज्या कारणांमुळे अपघात होतात (उदा. विना हेल्मेट, विना सिटबेल्ट, अतिवेग, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, धोकादायक व बेकायदेशिरपणे प्रवासी वाहतुक करणे, विना रिफ्लेक्टर व टेललाईट इ.) त्या मुख्य शिर्षकाअंतर्गत प्रभावीपणे कारवाई करतील.

९) नागरीकांमध्ये रस्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी स्थानिक पोलीस स्टेशनच्या मदतीने महामार्गालगत असणाऱ्या गावात जाऊन स्थानिक ग्रामपंचायत सदस्यांच्या मदतीने / सहकार्याने हेल्मेट व सिटबेल्ट वापरण्याबाबत तसेच रस्ते अपघाताबाबत जनजागृती करावी, तसेच शाळा, महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षाबाबत कार्यक्रमांचे आयोजन करून हेल्मेट व सिटबेल्ट वापरण्याबाबत, तसेच रस्ते अपघाताबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करतील

१०) महत्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंच्या प्रवासाच्या वेळी महामार्गावरील वाहतुक सुरळीत व मुरक्षित ठेवतील.

११) प्रवाश्यांसोबत सौजन्याने वागतील व सभ्यतेची वागणुक देतील.

१२) मुंबई पोलीस कायदा ६६ प्रमाणे वाहतुक नियमनाशी संबंधित सर्व कर्तव्ये पार पाडतील.

१३) कर्तव्याचे ठिकाणी वेळेवर पोहोचुन प्रभारी अधिकारी यांनी दिलेली कार्य शिस्तीने पुर्ण करतील.

१४) केलेल्या कार्याचे नोंद पॉकेट डायरी / वर्कशिट मध्ये घेतील.

१५) महामार्ग पोलीस एता सुरक्षेतेच्या दृष्टीने वरिष्ठांनी जारी केलेले परिपत्रक व निरीक्षण टिप्पणी, शासन आदेशाची माहीती घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही करतील.

१६) मा. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व आदेश यांची तत्परतेने अंमलबजावणी करतील.

**म.पो. केंद्र प्रभारी अधिकारी/ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक यांचे कर्तव्य**

१) महामार्ग पोलीस केंद्रास नेमणुकीस असलेले. ग. पी. केंद्र प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे हाताखालील नेमणुकीस असलेले पोलीस आधकारी यासानेवारी यांचेवर देखरेख करतील व नियंत्रण ठेवतील.

२) त्यांचे हातांडयातील अधिकारी व कर्मचारी यांचे शिस्त व कार्य क्षमतेस ज़याबदार राहतील.

३) महामार्ग पोलीस केंद्रातील सर्व साधन सामुग्री, वाहने, शस्त्रे, दारुगोळा, यैरिकैडस्, जनरेटर व इतर सर्व साहित्यांची सुरक्षीत व योग्य ठेवण्याची जबाबदारी पार पाडतील.

४) हाताखालील पोलीस कर्मचाऱ्यांची गाऱ्हांणी व तक्रारी सोडविण्यासाठी प्रयत्न करतील.

५) महाभार्ग पोलीस केंद्रावर असलेल्या कर्मचारीचे ड्युटी वाटप करणे, प्रसंगानुसार कर्तव्यावर लावणे व कर्तव्य वाटपात समतोलता राखणे व न्यायोचित धोरण राबवतील.

६) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी वाहन चालक/प्रवाशी व जनतेशी सद्भावना पुर्वक सभ्यतेने वागावे व तत्परतेने मदत करावी.

७) पोलीस कर्मचारीची पॉकेट डायरी किंवा वर्कशिटची नियमीतपणे आढावा घेवुन तपासणी करतील.

८) प्रभारी अधिकारी व संबंधित उपनिरीक्षक हे कामकाजाचे आठवडा डायरी नियमीत सादर करतील.

९) महामार्ग पोलीसांची प्रतीमा डागालु नये म्हणुन हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांना भ्रष्ट आचरण, संदेहपुर्ण वर्तन व बेकायदेशीर कृत्यांपासुन दुर ठेवण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवतील व त्यावर आळा घालण्यासाठी व नियंत्रण घालण्यासाठी प्रयत्न करतील.

१०) जखमी प्रवासी व चालक इत्यादीना वैद्यकिय सुविधा तात्काळ मिळणेसाठी प्रयत्नशिल राहतील.

११) वाहतुक विषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करतील.

१२) महामार्गावर ज्या कारणांमुळे अपघात होतात (उदा. विना हेल्मेट, विना सिटबेल्ट, अतिवेग, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, धोकादायक व बेकायदेशिरपणे प्रवासी वाहतुक करणे, विना रिफ्लेक्टर व टेललाईट इ.) त्या मुख्य शिर्षकाअंतर्गत प्रभावीपणे कारवाई करतील.

१३) म.पो. केंद्रातील अंमलदार हे ई-चलान उपकरण व्यवस्थित हाताळत आहेत काय यावर लक्ष ठेवतील.

१४) वाहतुकीचे परिस्थिती व प्रसंगानुसार योग्य ते नियमन करतील.

१५) महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तिंच्या प्रवासाच्या वेळी महामार्गावरील वाहतुक सुरळीत व मुरक्षित ठेवतील.

१६) प्रभारी अधिकारी यांनी म. पी. केंद्राच्या हद्दीत अपघात झाल्यास तात्काळ महामार्ग पोलीस मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई व महामार्ग पोलीस विभाग संबंधीत प्रादेशिक नियंत्रण कक्ष येथे माहिती देवून तात्काळ कर्मचाऱ्यांसह अपघातस्थळी रवाना व्हावे. अपघातस्थळी पोहचल्यावर अपघाताचे स्वरूप गंभीर असल्यास व अतिरिक्त मदतीची आवश्यकता भासल्यास तात्काळ नियंत्रण कक्षास माहिती देवून लगतच्या म.पो. केंद्राची मदत घ्यावी. ज्या म.पो. केंद्राच्या प्रभारी अधिकारी यांच्याकडे मदतीची मागणी केली आहे. त्या म. पो. केंद्राच्या प्रभारी अधिकारी यांनी स्वतः व पुरेशा कर्मचारी वार्गासह घटनास्थळी रवाना व्हावे.

## पोलीस निरीक्षक, महामार्ग पोलीस विभाग यांचे कर्तव्ये

१) पोलीस निरीक्षक यांनी आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचारीचे दैनदिन कामावर देखरेख व नियंत्रण ठेवतील तसेच समन्वय ठेवतील.

२) म.पो. केंद्रांना १५ दिवसांतुन एकदा भेटी देवुन परिस्थितीची माहीती करुन घेतील. अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमत्ता व शिस्त राखणेसाठी योग्य ती कार्यवाही करतील.

३) म.पो. केंद्रावरील निरनिराळया हजेरी नोंदवहया, मोटार वाहन कायदेचे रजिस्टर व जडवस्तु संग्रह रजिस्टर, साधन सामुग्री, आर्म आम्युनेशन, वाहन/वायरलेस (बिनतारी संदेश यंत्रणा), क्रेन, ॲम्ब्युलन्स इत्यादी बाबतचे रजिस्टर/कागदपत्र तपासतील व नियंत्रणाच्या दृष्टीकोनातुन कार्यरत राहतील.

४) महामार्ग पोलीसांची प्रतीमा डागालु नये म्हणुन हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांना भ्रष्ट आचरण, संदेहपुर्ण वर्तन व बेकायदेशीर कृत्यांपासुन दुर ठेवण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवतील. त्याबाबत गोपनीय माहिती काढावी व म.पो. केंद्र यांना अचानक भेटी देतील.

५) महामार्ग पोलीस मदत केंद्रात असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांची शिस्त व योग्य वर्तवणुकीची दखल घेवुन सौजन्यपुर्वक वागणुकीबद्दल भेटीच्या दरम्यान सुचना देतील.

६) पोलीस निरीक्षक यांनी ०२ किंवा ०२ पेक्षा जास्त इसम अपघातात मयत झाल्यास अशा अपघात स्थळांना भेटी देतील, परंतू अपधात संवेदनशिल असल्यास मयत/गंभीर जखमी संख्येची मार्यादा न पाहता त्वरीत अपघात स्थळास भेट देवून मार्गदर्शन करतील.

७) सेवाभावी स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने महामागांवर रस्ते सुरक्षा संबंधी जनजागृतीपर फलक / होर्डीग लावतील

८) आपल्या विभागातील म.पो. केंद्रातील अधिकारी व अंमलदार यांचेकडून रस्ता सुरक्षा अभियान प्रभावीपणे राबविण्याकरीता जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात रस्ता सुरक्षे संबंधी जागृती करण्याचे अनुषंगाने आराखडा तयार करतील.

९) नागरीकांमध्ये रस्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी महामार्गालगत असणाऱ्या गावात, शाळा, महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षाबाबत कार्यक्रमांचे आयोजन करतील.

१०) जिल्हा वाहतूक शाखा व रस्त्याची देखभाल करणारे इतर विभाग (PWD/NHAI/MSRDC/Local Authority) यांचेशी समन्वय साधतील.

११) राष्ट्रीय/राज्य महामार्ग व द्रुतगती मार्गावर होणाऱ्या अपघातांच्या कारणाची माहिती घेऊन पुन्हा त्या ठिकाणी अपघात होणार नाहीत याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करतील.

१२) महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी, तसेच वाहतुकीरा शिस्त लागावी यासाठी कसुरदार वाहन चालकांविरुध्द प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करतील.

१३) महामार्गावर ज्या कारणांमुळे होतात (उदा. विना हेल्मेट, विनां सिटबेल्ट, अतिवेगार न चालविताना मोबाईलचा चाळे कराधान कोवायक व बेकायदेशिरपणे प्रवासी वाहतुक करणे, विना रिफ्लेक्टर व टेललाईट इ.) राईल चाख्यापर करणे धोका वाचावीपणे कारवाई होईल याबबात दक्ष राहतील.

१४) ई-चलान उपकरण अधिकारी व अंमलदार हे व्यवस्थित हाताळत आहेत काय यावर लक्ष ठेवतील.

१५) महामार्गावरील अपघात हे प्रत्येक वर्षी १० टक्क्यांनी कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करतील.

१६) आपल्या विभागातील महामार्गावरील ब्लॅक स्पॉटना भेटी देवून त्या ठिकाणी करावयाच्या अल्प/मध्यम / दिर्घ उपाययोजना संबंधीत विभागास सुचवाव्यात व त्या करून घेण्याबाबत पाठपुरावा करतील.

१७) आपल्या विभागातील राष्ट्रीय महामार्गास मिळणारे रस्त्यांच्या ठिकाणी (जंक्शन पॉईट) अपघात होऊ नयेत यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत (उदा. स्पीड ब्रेकर/म्बलर टाकणे, सिग्नल / ब्लिंकरर्स बसविणे, हायमास्ट बसविणे, निर्देशक फलक बसविणे इत्यादी) संबंधीत विभागांशी समन्वय साधून पाठपूरावा करतील.

१८) आपल्या विभागातील घाट रस्त्याची पाहणी करून दरड कोसळणारी ठिकाणे व अतघात क्षेत्र येथे उपाययोजना करण्याबाबत संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करतील.

१९) आपल्या विभागातील असलेले म.पो. केंद्र यांना वाटप करण्यात आलेल्या साधनसामुग्रीची तपासणी करून त्यांची योग्य प्रकारे देखरेख होत असल्याबाबत पाहणी करतील..

२०) मा. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व आदेश यांची तत्परतेने अंमलबजावणी करतील.

## पोलीस उप-अधिक्षक, महामार्ग पोलीस विभाग यांचे कर्तव्य

१) उप अधिक्षक हे नेमुन दिलेल्या परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर देखरेख / नियंत्रण ठेवतील. अधिकारी व कर्मचारीची कार्यक्षमता व शिस्त यांना जबाबदार राहतील.

२) कार्यक्षमता व शिरत राखणेसाठी म. पो. केंद्राना महिन्यातुन एकदा भेटी देवून कामाची तपासणी करतील. शिस्त व नियंत्रणासाठी योग्य ती कार्यवाही करतील. म. पो. फैद्राची वर्षातुन किंमान एकदा वार्षीक तपासणी करतील.

३) महामार्ग पोलीसांची प्रतीमा डागाळू नये म्हणुन हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांना भ्रष्ट आचरण, संदेहपुर्ण वर्तन व बेकायदेशीर कृत्यांपासुन दुर ठेवण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवतील. त्यायायत गोपनीय माहिती काढावी व म.पो. केंद्र यांना अचानक भेटी देतील.

४) उप अधिक्षक हे म.पो. केंद्रावर ठेवण्यात आलेली शस्त्र व दारुगोळा, बिनतारी संदेश यंत्रणा, टेलिफोन, बेरिकेडस्, डेडस्टॉक (जड वस्तु संग्रह) रजिस्टर, नोंदवही, कार्यालयाशी निगडीत रेकॉर्ड, मोटार वाहन कायदा केसेस रजिस्टर इत्यांदीची तपासणी करतील तसेच वाहनांचे लॉगयुक तपासतील.

५) पोलीस अधिकारी व अंमलदार यांची गाऱ्हाणी ऐकुण ती सोडविण्यासाठी प्रयत्नशिल राहतील.

६) पोलीस उप-अधीक्षक हे त्यांचे कार्यक्षेत्रातील म. पो. केंद्रातील कर्मचाऱ्यांची वार्षीक सेवापुस्तक तपासणी करतील.

७) पोलीस उप-अधिक्षक यांनी ०३ किंवा ०३ पेक्षा जास्त इसम अपघातात मयत झाल्यास अशा अपघात स्थळांना भेटी देतील, परंतू अपघात संवेदनशिल असल्यास मयत/गंभीर जखमी संख्येची मार्यादा न पाहता त्वरीत अपघात स्थळास भेट देवून मार्गदर्शन करतील.

८) जिल्हा वाहतूक शाखा व रस्त्याची देखभाल करणारे इतर विभाग (PWD/NHAI/MSRDC/Local Authority) यांचेशी समन्यय साधतील.

९) नागरीकांमध्ये रस्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी महामार्गालगत असणाऱ्या गावात, शाळा, महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षाबाबत कार्यक्रमांचे आयोजन करतील.

१०) राष्ट्रीय व राज्य महामार्ग व द्रुतगती मार्गावर होणाऱ्या अपघातांच्या कारणाची माहिती घेऊन पुन्हा त्या ठिकाणी अपघात होणार नाहीत याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करतील.

११) आपल्या कार्यक्षेत्रातील महामार्गावरील ब्लॅक स्पॉटना भेटी देवून त्या ठिकाणी करावयाच्या अल्प/मध्यम/दिर्घ उपाययोजना संबंधीत विभागास सुचवाव्यात व त्या करून घेण्याबाबत पाठपुरावा करतील.

१२) महामार्गावरील अपघात है प्रत्येक वर्षी १० टक्क्यांनी कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करतील.

१३) महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी, तसेच वाहतुकीस शिस्त लागावी यासाठी कसुरदार वाहन चालकांविरूध्द्ध प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करतील.

१४) महामार्गावर ज्या कारणांमुळे अपघात होतात (उदा. विना हेल्मेट, विना सिटबेल्ट, अतिवेग, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करपधात होतात (उदा. विना हेल्मेटवानी वाहतुक करणे, विना रिफ्लेक्ट व टेललाईट इ.) त्या मुख्य शिर्षकाअंतर्गत प्रभावीपणे कारवाई होईल याबबात दक्ष राहतील.

१५) ई-चलान उपकरण अधिकारी व अंमलदार हे व्यवस्थित हाताळत आहेत काय यावर लक्ष ठेवतील.

१६) आपल्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गास मिळणारे सत्यांच्या ठिकाणी (जंक्शन पॉईट) अपघात होर नयेत यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत (उदा. स्पीड ब्रेकर/रम्बलर टाकणे, सिग्नल/ब्लिंकर

बसविणे, हायमास्ट बसविणे, निर्देशक फलक बसविणे इत्यादी) संबंधीत विभागांशी समन्वय साधू पाठपुरावा करतील.

१७) आपल्या कार्यक्षेत्रातील घाटरस्त्याची पाहणी करून दरड कोसळणारी ठिकाणे व अपघात क्षेत्र ये उपाययोजना करण्याबाबत संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करतील.

१८) आपल्या अखत्यारित असलेले म.पो. केंद्र व म.पो.विभाग यांना वाटप करण्यात आलेल्या साधनसामुग्री तपासणी करून त्यांची योग्य प्रकारे देखरेख होत असल्याबाबत पाहणी करतील.

१९) मा. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व आदेश यांची तत्परतेने अंमलबजावणी करतील.

**पोलीस अधिक्षक, महामार्ग पोलीस परिक्षेत्र यांचे कर्तव्ये**

१) पोलीस उप अधिक्षक महामार्ग पोलीस, विभागीय पोलीस निरीक्षक, म. पी. केंद्र प्रभारी अधिकारी व त्यांचे हाताखालील इतर अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करतील.

२) परिक्षेत्रातील मुख्य पोलीस अधिक्षक या नात्याने नियंत्रणा खालील येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देणे, कार्यक्षम ठेवणे, अधिकारी व कर्मचारी यांच्यात शिरंत राखण्याचे दृष्टीकोनातुन त्यांचे दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे, तसेच अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करतील.

३) म.पो. केंद्र येथे वारंवार व अचानक भेटी देवुन अधिकारी कर्मचांन्यांची कार्यक्षमता तपासतील.

४) महामार्ग पोलीसांची प्रतीमा डागालु नये म्हणुन हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांना भ्रष्ट आचरण, संदेहपुर्ण चर्तन व बेकायदेशीर कृत्यांपासुन दुर ठेवण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवतील. त्याबाबत गोपनीय माहिती काढावी व म. पो. केंद्र व म. पो. विभाग यांना अचानक भेटी देतील.

५) परिक्षेत्रात त्यांनी दौरा करताना म.पो. केंद्राची वर्षातुन एकदा तपासणी करावी. तसेच हाताखालील अधिकारी कर्मचारी यांचे कामाची माहीती मिळयुग योग्य त्या उपाययोजना करतील.

६) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कल्याणासाठी प्रयत्नशिल राहतील.

७) पोलीस अधिक्षक यांनी ५ किंवा ० पेक्षा जास्त इसम अपघातात मयत झाल्यास अशा अपघात स्थळांना भेटी देतील, परंतू अपघात संवेदनशिल असल्यास मथल /गंभीर जखमी संख्येची मर्यादा न पाहता त्वरीत अपघात स्थळास भेट देवून मार्गदर्शन करतील.

८) वाहतुकीच्या सुरक्षतेच्या दृष्टीने वेगावर नियंत्रण राहाणेसाठी परिस्थितीनुसार वाहनांचे वेग नियंत्रण करणेसाठी लागणारे आवश्यक त्या सुचना / अधिसूचना काहुन / निर्देश देतील व आवश्यक ती कार्यवाही करतील.

९) वाहतुक नियमनाच्या दृष्टीने योग्य ते निर्देश देणे, नियमन करणे व रस्ता बलविणे (डायर्व्हेशन करणे) व वाहनांचे मार्ग ठरवतील.

१०) पोलीस अधिक्षक यांचे कार्यक्षेत्रातील महामार्ग पोलीस केंद्रातील कर्मचाऱ्यांची वार्षीक सेवापुस्तक तपासणी करतील.

११) जिल्हा पोलीस अधीक्षक व रस्त्याची देखभाल करणारे इतर विभाग (PWD/NHAI/MSRDC/Local Authority) यांचेशी समन्यय साधतील.

१२) नागरीकांमध्ये स्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी महामार्गालगत असणाऱ्या गावात, शाळा. महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षायायत कार्यक्रमांचे आयोजन करतील.

१३) राष्ट्रीय व राज्य महामार्गाचे याहतुकीच्या दृष्टीकोनातून लेखापरिक्षण (Audit) करतील.

**पोलीस निरीक्षक (वाचक) कामकाज**

| | |
|---|---|
| १ | मुख्यालयातील अधिकारी अंमलदार/रायडर/चालक/ऑर्डरली यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण व कर्तव्य वाटप, दैनंदिन हजेरी / रजा इत्यादीबाबत कामकाज करणे. |
| २ | माहिती अधिकार संदर्भातील कामकाज व जनमाहिती अधिकारी म्हणून कामकाज पहाणे |
| ३ | पदयात्रा परवानगीबाबतचा पत्रव्यहार |
| ४ | सर्व प्रकारच्या तक्रारी/विनंती अर्जाची चौकशी व अहवाल बाबतचे कामकाज |
| ५ | घटक कार्यालयातील अधिकारी यांची आठवडा डायरी तपासणी करणे. |
| ६ | घटक कार्यालयातील अधिकारी यांचे मासिक कामगिरी अहवाल तपासणी करणे. |
| ७ | मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), म. राज्य, मुंबई यांच्या दालनात बैठका आयोजित करणे, डीजीपी/ आयजीपी कॉन्फरन्स, हाफ इयरली कॉन्फरन्स व इतर कॉन्फरन्स/ परिषद/ तक्रार निवारण समिती/ बैठकांसाठी माहिती/फाईल तयार करणे व त्या संबधीचे अहवाल सादर करणे. |
| ८ | कार्यालयातील महत्त्वाच्या फाईलींची माहिती ठेवणे व त्यांच्या दुय्यम फाईल तयार करणे. |
| ९ | अर्थसंकल्पिय, पावसाळी व हिवाळी अधिवेशन संदर्भातील तारांकित / अतारंकित/लक्षवेध व इतर अहवाल शासनास सादर करणे. |
| १० | कार्यालयास लागणाऱ्या साधनसामुग्रीची खरेदी करणे. |
| ११ | महामार्ग पोलीस विभागासंबधीत प्रेस नोट तयार करणे. |
| १२ | मुख्यालयातील नियंत्रण कक्षाच्या कामकाजावर देखरख करुन अपघातांच्या घटनांचा दैनंदिन अहवाल तयार करुन वरिष्ठांना सादर करणे व त्यावर वरिष्ठांनी आदेशित केल्याप्रमाणे संबधीत अधिकारी यांना चेकलिस्ट पाठविणे. |
| १३ | महामार्गावरील चोरी, दरोडे, दहशतवादी कारवाया यांची माहिती संकलित करणे. |
| १४ | नियंत्रण कक्षातील सर्व नोंद वहयांमध्ये (ओडीसी/मुंबई-पुणे द्रुतगती/प्राणंतिक अपघात / किरकोळ व गंभीर/तक्रार / टेलिफोन / टपाल / व इतर नोंदवही) नोंद घेणे. |
| १५ | दैनदिन केसेसेची माहिती घेणे. |
| १६ | म.पो. केंद्रातील वाहनांचे किलोमीटर तपासणी करणे. |
| १७ | कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर व सुटीच्या दिवशी टपाल घेणे |
| १८ | महामार्ग पोलीस मुख्य नियंत्रण कक्षा संबधीत इतर व सर्व कामकाज |
| १९ | महामार्ग पोलीस विभागाशी संबधीत न्यायालयीन प्रकरणांबाबतचे कामकाज |
| २० | परिपत्रक व शासन निर्णय सर्व संबधितांना वितरण करणे. |
| २१ | समाधान हेल्प लाईन अहवाल कामकाज अहवाल |
| २२ | पोलीस महासंचालक कार्यालयातून बंदोबस्त पुरवणेबाबत आलेल्या आदेशानुसार महामर्गा पोलीस परिक्षेत्रातील मनुष्यबळ बंदोबस्तासाठी पुरवणेबाबतचे कामकाज |
| २३ | महामार्ग पोलीस विभागासी संबधीत नसलेले तसेच नियोजन विभाग, सांख्यिकी व अपघात विश्लेषण विभाग यांच्याकडे वाटप नसलेल्या विषयाबाबतचे प्राप्त पत्रव्यवहार याची प्राथमिक पूर्तता करुन सदर विषय अथवा प्रकरण ज्या शाखेशी/ विभागशी संबधीत आहे त्या शाखेस/विभागास वरिष्ठांच्या मान्यतेने वर्ग करणे. |

पोलीस निरीक्षक (नियोजन) कामकाज

| | |
|---|---|
| १ | नियोजन विभागाशी संबधीत बैठकांच्या फाईल तयार करण्यास मदत करणे. |
| २ | ब्लॅकस्पॉटची यादी तयार करण्यास मदत करणे. |
| ३ | नियोजन विभागाशी संबधीत राज्यातील इतर घटकांकडून माहिती प्राप्त करणे. |
| ४ | म.पो. केंद्र जागा अहवाल बाबत आस्थपना विभागा मार्फत समन्वय साधून अहवाल सादर करणे. |
| ५ | द्रुतगती/राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील व इतर मार्गावरील उपाय योजना |
| ६ | रस्ता सुरक्षा विषयक कार्यक्रमाचे अहवाल व प्रस्ताव |
| ७ | नियोजन विभागाशी संबधीत बैठकांच्या फाईल तयार करण्यास मदत करणे. |
| ८ | ब्लॅकस्पॉटची यादी तयार करण्यास मदत करणे. |
| ९ | नियोजन विभागाशी संबधीत बैठकांच्या फाईल तयार करण्यास मदत करणे. |
| १० | ब्लॅकस्पॉटची यादी तयार करण्यास मदत करणे. |
| ११ | नियोजन विभागाशी संबधीत राज्यातील इतर घटकांकडून माहिती प्राप्त करणे. |
| १२ | म.पो. केद्र जागा अहवाल बाबत आस्थपना विभागा मार्फत समन्वय साधून अहवाल सादर करणे. |
| १३ | द्रुतगती/राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील व इतर मार्गावरील उपाय योजना |
| १४ | रस्ता सुरक्षा विषयक कार्यक्रमाचे अहवाल व प्रस्ताव |
| १५ | नियोजन विभागाशी संबधीत इतर प्रस्ताव/टिपणी |
| १६ | सर्वोच्च न्यायालय रस्ते सुरक्षा समिती परिषद निर्देशांची पूर्तता अहवाल |
| १७ | सर्वोच्च न्यायालय राज्य रस्ता सुरक्षा परिषद निर्देशांची पूर्तता अहवाल |
| १८ | नियोजन विभागाशी संबधीत प्रदर्शन संदर्भात अधिकारी व अंमलदार नामनिर्देशन अहवा |
| | महामार्ग पोलीस विभाग साधनसामुग्री विनिर्देश/वाटप/किट कमिटी |
| १९ | नवीन म.पो. केंद्र मंजुरीचे प्रस्ताव वरिष्ठ कर्यालयीन अधिक्षक (अस्थापना विभाग) यांच्या मार्फतीने सादर करणे. |
| २० | वरिष्ठांनी सांगितलेले नियोजन विभागाशी संबधीत शासनास पाठवायचे प्रस्ताव |
| २१ | नियोजन विभागाशी संबधीत अधिसूचना व परिपत्रक निर्गमीत करणे. |
| २२ | पावसाळा पूर्व उपाययोजना |
| २३ | गणेशउत्सव पूर्व तयारी व उपाययोजना |
| 24 | नियोजन विभागाच्या संबधीत बैठकांच्या फाईल तयार करणे. |
| 25 | रस्ता सुरक्षा अभियान |
| 26 | मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाबाबतचे अहवाल उपाय योजना व इतर ITMS अहवाल |
| 27 | सेव्ह लाईफ फाऊंडेशन संदर्भातील अहवाल |
| 28 | महामार्ग पोलीस विभागातील वाहनांची माहिती, वाटप व अहवाल |
| 29 | कार्यक्रम अंदाज पत्रक तयार करणे. |
| 30 | द्रुतगती मार्ग व इतर महामार्गावर विविध शासकीय संस्थाना काम करण्याची NOC परवानी देणे |
| 31 | राज्य कृती आराखडाबाबत कामकाज पहाणे. |
| 32 | नवीन म.पो. केंद्र मंजुरीचे प्रस्ताव वरिष्ठ कर्यालयीन अधिक्षक (अस्थापना विभाग) यांच्या मार्फतीने सादर करणे. |

**पोलिस निरीक्षक (अपघात, सांख्यिकी व ई-चलान)**

| | |
|---|---|
| १ | ई चलान विभागाशी संबधीत सर्व कामकाज पाहाणे |
| २ | रस्ते अपघात तसेच वाहतूक केस व दंड यांचे विश्लेषण करणे. |
| ३ | अपघातांची माहिती संकलित करुन विश्लेषण करणे व त्याचा अहवाल सादर करणे. |
| ४ | राज्यातील व महामार्ग पोलीस विभागातील माहेवारी अपघात सांख्यिकी व वाहतूक केसेस माहिती संकलित करुन अहवाल तयार करणे |
| ५ | महामार्ग सुरक्षा पथकातील म.पो. केंद्रनिहाय व परिक्षेत्रनिहाय माहेवारी अपघात सांख्यिकी व वाहतूक केसेसची माहिती संकलित करुन अहवाल तयार करणे. |
| ६ | थर्ड पार्टी इन्शुरनस, लायसन्स सस्पेंशन प्रपोजल बाबत सांख्यिकी माहिती पोलीस घटक व म.पो. केंद्रनिहाय तयार करणे. |
| ७ | राज्यातील पोलीस घटकांकडून माहेवारी डिटेल ॲक्सीडेंट रिपोर्ट संदर्भातील माहिती संकलित करुन अहवाल तयार करणे. |
| ८ | मिडीया, एन.जी.ओ., पी.पी.टी., आर.टी.ओ., आर.टी.आय. यांनी मागणी केलेल्या माहितीची वेळोवेळी पूर्तता करणे. |
| ९ | वाहतूक व इतर प्रशिक्षणाबाबतचे कामकाज तसेच वेबिनार, कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे बाबत अधिकारी अंमलदार यांचे नामनिर्देशन करणे. |
| १० | मृत्युंजय दूत संदर्भातील कामकाज पाहाणे |
| 11 | महामार्ग पोलीस विभागाची वेबसाईट देखरेख व अपडेट करणे. |
| 12 | iRAD/eDAR संदर्भातील कामकाज |
| 13 | मिनीस्ट्री ऑफ ट्रांसपोर्ट अँड हायवे (मॉर्थ), न्यू दिल्ली, येथील वार्षीक फॉर्मेट ४ (१ ते २१ शिटस) तयार करून अहवाल सादर करणे. |
| 14 | सहामाही व वार्षीक मोटार अपघातांचे सांख्यिकी विश्लेषण तयार करणे. |
| 15 | राज्यातील अपघाताबाबत विश्लेषणत्मक वार्षीक रस्ते अपघात पुस्तीका तयार करुन प्रसिद्ध करणे. |